# तंबाखुजन्य पदार्थ खाऊन थुंकणाऱ्यांवर कारवाई



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** जिल्ह्यातील आरोग्य संस्था तंबाखुमुक्त घोषित करण्यात आलेल्या असतांनाही आरोग्य संस्था परिसरात तंबाखुजन्य पदार्थ खावून थुंकतात असे आढळून आले आहे. त्यामुळे सामान्य रुग्णालय परिसरात तंबाखुजन्य पदार्थ खाऊन थुंकणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

रुग्णालय परिसरात येणारे रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक तंबाखु, गुटखा तसेच इतर तंबाखुजन्य पदार्थ खावुन थुंकतात. त्यामुळे रुग्णालयीन परिसर व आरोग्य संस्थेमध्ये घान निर्माण होऊन अनेक प्रकारच्या संसर्गजन्य आजारांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता निर्माण होते. या दुष्परिणामाची जागरुकता निर्माण करुन सदर कारवाई करण्यात आली आहे.

अशा प्रकारची कारवाई दररोज करण्याचे आदेश जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सचिन तडस यांनी तंबाखु नियंत्रण समितीच्या पथकाला दिले आहे. यामध्ये केंद्र शासनाचा तंबाखु आणि तंबाखुजन्य पदार्थ कायदा २००३ मधील कलम ४ नुसार सार्वजनिक ठिकाणी तसेच तंबाखुमुक्त परिसरामध्ये तंबाखु, गुटखा तसेच इतर तंबाखुजन्य पदार्थ खाणे, खावून थुंकणे, खावुन येणे, जवळ बाळगणे यावर बंदी असून असे करतांना आढळल्यास संबंधित व्यक्तीवर कार्यवाही केल्या जाणार आहे. असे करतांना आढळल्यास संबंधित संस्थेच्या प्रमुख अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. तंबाखु मुक्तीसाठी १८००११२३५६ क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा शल्य चिकित्सक यांनी कळविले आहे.

# पतंजली चे वतीने रानभाज्या ओळख व श्रमदान शिबिर



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**हिंगणघाट :** पावसाळ्यात रानभाज्या मोठ्या प्रमाणात येत असतात या भाज्यांची ओळख व फायदे माहिती होण्याचे दृष्टीने पतंजलि परिवार हिंगणघाट चे वतिने रा.सू. बिडकर महाविद्यालयातील क्रीडा संकुल परिसरात श्रमदानं व रानभाज्या ओळख, उपयोग हा कार्यक्रम पतंजली जिल्हा अध्यक्ष वसंतराव पाल व योग शिक्षक योगेश सुंकटवार यांचे मार्गदर्शनात पार पडला यावेळी श्रमदानातून क्रिडा संकुलन परिसर स्वच्छ करण्यात आला या उपक्रमात स्व इच्छानी विकास प्राथमिक शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी या परीसरातील राणभाज्या भुईआवळा, करटोली, मायाळू, दिंडा, तरोटा यासारखे रानभाज्याची ओळख व उपयोग माहिती करुन देण्यात आली.

या पावसाळ्यात वड, पिंपळ, निंब, हि दिर्घ आयुष्यी वृक्ष श्रमदानातून वृक्षारोपण व संगोपणाचे कार्य पतांजलि परिवाराचे वतीने करणार असल्याचे प्रा.सुरेश दविले म्हणाले या कार्यात राजा महाराज शेंडे, अनिल राजपांडे, वैभव निनावे, सुरेश दविले, आयुष हावगे, पुरणलाल जैस्वाल, डॉ. नाखले, रवि भालेराव, अनिल बुचे, प्रमोद भाईमारे, परमेश्वर खडसे, शिक्षक सुरेश वडूले, तेजने सह विद्यार्थी सहभागी झाले होते.

# कारगिल दिवस कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** जिल्हा सैनिक कार्यालयाच्यावतीने दि.२६ जुलै रोजी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली कारगिल दिवस साजरा करण्यात येणार आहे. या कारगिल विजय दिवस समारंभ कार्यक्रमास जिल्ह्यातील वीरमाता, वीरपत्नी माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व अवलंबितांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दि.२६ जुलै रोजी दुपारी ३ वाजता विकास भवन येथे कारगिल विजय दिवस समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी फ्ला. ले. धनंजय सदाफळ यांनी कळविले आहे.

# आष्टी येथे तालुकास्तरीय माजी सैनिकांची बैठक

**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्यावतीने माजी सैनिकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यासाठी आष्टी येथे तहसिलदार सचिन कुमावत यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी फ्ला.ले.धनंजय सदाफळ यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बैठकीमध्ये तहसिलदार सचिन कुमावत यांनी माजी सैनिकांकरीता असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन त्यांच्या विविध समस्यांचे समाधान केले. तसेच माजी सैनिक व त्यांच्या अवलंबितांच्या अडचणी, तक्रारी प्राप्त झाल्यास त्या प्राधान्याने सोडविण्यात येणार असल्याचे सांगितले. दर सहा महिन्यांनी बैठक घेण्याच्या सूचना सुध्दा यावेळी त्यांनी केल्या.

तहसिल कार्यालय येथे आयोजित तालुकास्तरीय बैठकीला आष्टी पोलिस स्टेशनचे पोलिस कॉन्स्टेबल नंदकिशोर वाढवे, अशासकीय सदस्य माजी सैनिक रिजवान अहमद, रमेश दडाळे, अशोक विजयकर आदी उपस्थित होते, असे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने कळविले आहे.

# बार्टीतर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** तळेगाव ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे यांच्याकडून लोकशाही अण्णाभाऊ साठे यांना मानवंदना अर्पण करण्यात आली या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय तळेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करून कार्यक्रम घेण्यात आला.

त्या ठिकाणी या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून तळेगाव ग्रामपंचायत सरपंच सौ. छबूताई खंडार प्रमुख पाहुणे म्हणून पप्पू भुयार उपसरपंच तसेच प्रमुख पाहुणे विनायक भांगे समतादूत म्हणून व प्रीतम गायकी अनुलोम भाग प्रमुख उपस्थित होते. सर्वप्रथम अध्यक्षांनी फोटोचे पूजन करून प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकून या कार्यक्रमानिमित्त समता दूत विनायक भांगे तालुका आष्टी यांनी बार्टी व समाज कल्याण च्या योजनांची माहिती देण्यात आली. व प्रीतम गायकी यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकून अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमाचे संचालन मायाताई वानखेडे यांनी केले व आभार प्रदर्शन गायकी यांनी केले. या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य लोक उपस्थित होते.

# नव भारत साक्षरता कार्यक्रमाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

* यावर्षी ९ हजार निरक्षरांना साक्षर करण्याचे उदिष्ट
* जिल्ह्यात कार्यक्रम राबविण्यासाठी स्वयंसेवक नेमणार

**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** केंद्र शासनाच्यावतीने नव भारत साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. साक्षरतेकडून समृध्दीकडे अशी या कार्यक्रमाची टॅग लाईन आहे. कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात यावर्षी ९ हजार ३११ निरक्षरांना साक्षर करण्याचे उद्दिष्ट आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आढावा घेतला. जिल्ह्यात हा कार्यक्रम प्रभाविपणे राबविण्यासाठी विविध क्षेत्रातील स्वयंसेवकांची नेमणूक करा. त्यांना प्रशिक्षण द्या, असे निर्देश बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीला जिल्हाधिकाऱ्यांसह अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, प्राथमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाच्या सहाय्यक आयुक्त निता औघड, जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मंगेश घोगरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

देशातील १५ वर्ष आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींना साक्षर बनविण्यासाठी हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. साक्षर बनविण्यासोबतच त्यांच्यात जीवन कौशल्य विकसित करणे, या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण याबाबींचा देखील समावेश आहे. हा कार्यक्रम मार्च २०२७ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्याला यावर्षी ९ हजार ३११ निरक्षरांना साक्षर बनविण्याचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमासाठी शासकीय, निमशासकीय, खाजगी शाळांव्यतिरिक्त शिक्षक पदाचे शिक्षण घेणारे, उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थी, पंचायत राज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा, नेहरू युवा केंद्र, एनएसएस, एनसीसी अशा ठिकाणच्या स्वयंसेवकांना निरक्षरांना साक्षर करण्यासाठी नेमणूक करण्यात येणार आहे. शाळांमध्ये सकाळी एक तास आणि सायंकाळी एक तास साक्षरता वर्ग घेतले जातील.

पुर्वी निरक्षरांना शिक्षित करण्यासाठी प्रौढ शिक्षण ही संज्ञा वापरली जायची. आता याऐवजी या कार्यक्रमांतर्गत सर्वांसाठी शिक्षण ही संज्ञा वापरली जाणार आहे. स्थानिक पातळीवर निरक्षर व स्वयंसेवकांचे सर्वेक्षण शाळास्तरावर केले जाणार आहे. निरक्षरांना शिक्षित करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या स्वयंसेवकांसह इतरही ईच्छूक व्यक्ती, संस्था स्वयंसेवक म्हणून काम करू शकतील. अशा स्वयंसेवकांची नेमणूक करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. नेमणूक केलेल्या सर्व स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.

# तळेगाव ते आर्वी या १२ किमी रखडलेला रस्त्याच्या कामाच्या निषेधार्थ भव्य पदयात्रा




**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**वर्धा :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटी तळेगाव श्यामजी पंत यांच्या वतीने तळेगाव ते आर्वी या १२ किमी पकडलेला रस्त्याच्या कामाच्या निषेधार भव्य पदयात्रा दिनांक २० जुलै २०२३ रोजी सकाळी आठ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक तळेगाव श्यामजी पंत ते उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी येथे मोठ्या संख्येने पायदळ पदयात्रा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीतळेगाव श्यामजी पंत च्या वतीने काढण्यात येणार आहे.

# पदोन्नतीसाठीही आता होणार टीईटीचे बंधन

**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**यवतमाळ :** प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये नियुक्तीसाठी शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे; परंतु आता पदोन्नती प्रक्रियेसाठीही टीईटीचे बंधन घातल्याने राज्यभरातील गुरुजींची भंबेरी उडाली आहे. राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषदेच्या (एनसीटीई) अधिसूचनेचा संदर्भ देऊन शिक्षण संचालकांनी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत अवगत केले आहे; परंतु या अटीमुळे विषय शिक्षकांच्या रिक्त जागा भरणे कठीण झाले आहे.

सहावी ते आठवीच्या वर्गांसाठी आरटीई कायद्यानुसार विषय शिक्षक नेमणे बंधनकारक आहे. त्याकरिता शिक्षण विभाग शिक्षकांपैकीच जे संबंधित विषयात पदवीधर आहेत, त्यांची विषय शिक्षक म्हणून बढती करतो. दहा वर्षांत भरतीची प्रक्रियाच न झाल्याने या नेमणुकाही रखडल्या. सध्या बहुतांश जिल्ह्यांमध्ये विषय शिक्षकांची हजारो पदे रिक्त असल्याने पदोन्नतीकरिता संघटनांनी प्रशासनाकडे धोशा लावला आहे. आता पदोन्नतीकरिता पदवीधरसोबतच टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शिक्षण संचालकांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना तशा तोंडी सूचनाही दिल्या आहेत. प्रत्यक्षात टीईटी परीक्षेची अंमलबजावणी २०१३ पासून सुरू झाली. पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेले शिक्षक हे २०१३ पूर्वी सेवेत लागलेले आहेत. यातील कोणाकडेही आता टीईटी प्रमाणपत्र नाही. त्यामुळे विषय शिक्षक म्हणून नेमके कुणाला पदोन्नत करावे, हा प्रश्न आहे. यावर तोडगा न निघाल्यास आरटीई कायद्यातील विषय शिक्षक नेमणुकीच्या तरतुदीचाही भंग होणार आहे.

**हजारो शिक्षकांना पदावनत करण्याचे आदेश**

आरटीईनुसार विषय शिक्षक नेमणे आवश्यक असल्यामुळे राज्य शासनाने २०१६ मध्ये केवळ बारावी उत्तीर्ण शिक्षकांना पदवीधर शिक्षक म्हणून पदोन्नती दिली; परंतु आता एनसीटीईच्या अधिसूचनेनुसार पदोन्नतीसाठी अर्हता धारण करणे आवश्यक आहे.

# शैक्षणिक संस्थांनी देशाच्या आर्थिक विकासात महत्वाची भूमिका पार पाडावी

* पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांचे प्रतिपादन
* विद्यापीठात आयडिया हंटिंग ॲन्ड पिचिंग इव्हेंटचे उद्घाटन



**साहसिक वृत्त / १९ जुलै**

**अमरावती :** शैक्षणिक संस्थांनी उद्योग क्षेत्रांशी समन्वयक साधून संशोधनाला चालना देणे व त्या माध्यमातून देश पातळीवर नवोपक्रम व नवसंशोधनांना प्रोत्साहन देवून देशाच्या आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजाविणे, ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभाग, शिक्षा संस्कृती उत्थान न्यास व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित आयडिया हंटिंग ॲन्ड पिचिंग इव्हेंट कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु, डॉ. प्रसाद वाडेगावंकर, विशेष अथिती म्हणून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य तथा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अमरावतीचे सचिव श्री आशिष सावजी, श्री गुरु गोविंदसिंह अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, नांदेडचे प्रा. रामचंद्र मांथलकर, विभागीय केंद्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर तांत्रिक विद्यापीठाचे डॉ. ब्रिजेश अय्यर, श्री. अतुल सराफ, कुलसचिव, डॉ. तुषार देशमुख, विभागाच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर उपस्थित होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ पूर्वीपासूनच समन्वयाने औद्योगिक क्षेत्रात कार्यतर असून या कार्यक्रमामुळे नवीन उद्योजक निर्माण करण्यास अधीकच मदत होईल. त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रातील संशोधनाचा वापर करुन अधिकाधिक उद्योजक निर्माण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन विशेष अतिथी श्री. किरण पातुरकर यांनी दिले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर म्हणाले, शिक्षण व औद्योगिक क्षेत्राच्या समन्वयातून अमरावती विभाग व देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने उद्योजकता व स्टार्टअप्सला प्रोत्साहन देणे अत्यावश्यक असून त्याकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ नियमित अग्रेसर आहे. विविध औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूकदार व विद्यार्थ्यांना एका व्यासपीठावर आणून त्यांना त्यांच्या नवकल्पनांचे रुपांतर उद्योगात करण्याची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम मैलाचा दगड ठरणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. प्रास्ताविकातून कार्यक्रमामागील भूमिका विभागाच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांनी मांडली. कार्यक्रमाला वित्त व विधी सल्लागार तथा अधिसभा सदस्य श्री. उज्वल बजाज, अस्पा बंड सन्स प्रा.लि चे संचालक श्री. रंजीत बंड, पालेकर बेकरीचे संचालक श्री. सुरेश ठाकूर, सनदी लेखापाल संघटना, अमरावतीचे अध्यक्ष श्री विष्णूकांत सोनी, ओरेग डिजिटल प्रा.लि. चे संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमित शाह, श्री. क्रिष्णा एझुथाचान, व्हेंचर कॅपीटल व हॉटेल चेन चे संचालक श्री. अखिलेश राठी, श्री. जयेश पनपालीया, लातूर येथील श्री. अतुल सराफ उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी आपले औद्योगिक नवकल्पनांचे सादरीकरण केले. सूत्रसंचालन श्री. अमोल हिरुळकर यांनी, तर आभार श्री. आनंद यादव यांनी मानले. कार्यक्रमाला विविध विभागातील विद्यार्थी, शिक्षक व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.